# उस्मानाबाद जिल्हा पोलीस भरती-2016

1. **भारताचे रेल्वे मंत्री कोण आहेत?**
   A. मनोहर पर्रिकर B. सुरेश प्रभु C. राजनाथ सिंग D. अरूण जेटली
2. **महाराष्ट्र शासन डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची 125 वी जयंती चे वर्ष काय म्हणून साजरा करत आहे?**
   A. समता व सामाजिक न्याय B. सामाजिक व आर्थिक न्याय
   C. समता व राजकीय न्याय D. सामाजिक व राजकीय न्याय
3. **महाराष्ट्र राज्याचे गृहमंत्री कोण आहेत?**
   A. एकनाथ खडसे B. विनोद तावडे C. देवेंद्र फडणवीस D. पंकजा मुंडे
4. **चक्र या शब्दातील च हा वर्ण कोणत्या प्रकारचा आहे?**
   A. मूर्धन्य B. दंत तालव्य C. कंठतालव्य D. तालव्य
5. **संधी करा : नौ + इक = ?**
   A. नावीक B. नौक C. नाईक D. नाविक
6. **एकमेकांचे शेजारी येणारे वर्ण हे जर स्वरांनी जोडले असतील तर तो संधीचा कोणता प्रकार आहे?**
   A. शब्द संधी B. स्वर संधी C. व्यंजन संधी D. विसर्ग संधी
7. **15 माणसे एक काम 24 दिवसांत करतात, तर तेच काम 12 माणसे किती दिवसात करतील?**
   A. 25 दिवस B.27 दिवस C. 20 दिवस D. 30 दिवस
8. **2800 रूपये मुद्दलाचे 2 वर्षांचे सरळव्याज 840 रूपये झाले, तर दर साल दर शेकडा व्याजाचा दर काय असावा?**
   A. 15% B. 12% C. 16% D. 10%
9. **15 मिलिमीटर + 65 सेंटीमीटर = किती मिटर?**
   A. 6.65 मीटर B. 0.7 मीटर C. 0.665 मीटर D. 15.65 मीटर
10. **तीन मुलांचे सरासरी वय 18 वर्ष असून, त्यांच्या वयाचे गुणोत्तर 2:3:4 आहे, तर त्यापैकी सर्वात लहान मुलाचे वय किती वर्ष आहे?**
    A. 9 वर्ष B. 10 वर्ष C. 11 वर्ष D. 12 वर्ष

**11. विष्णु वामन शिरवाडकर यांचे टोपण नांव कोणते?**

A. केशवसुत B. कुसुमाग्रज C. केशवकुमार D. बालकवी

**12. आमचा बाप अन् आम्ही या पुस्तकाचे लेखक कोण आहेत?**

A. नरेंद्र जाधव B. शंकरराव खरात C. नामदेव ढसाळ D. केशव मेश्राम

**13. शब्दांच्या जाती किती आहेत?**

A. सहा B. नऊ C. आठ D. सात

**14. जे शब्द, दोन शब्द किंवा दोन वाक्य यांना जोडतात त्यांना काय म्हणतात?**

A. विशेषण B. शब्दयोगी C. केवल प्रयोगी D. उभयान्वयी

**15. एका क्रिकेट खेळाडुने चार डावात अनुक्रमे 65, 32, 17 आणि 108 धावा काढल्या, तर त्याने सरासरी किती धावा काढल्या?**

A. 55 धावा B. 55.5 धावा C. 54 धावा D. 56.5 धावा

**16. 20-20 विश्वचषक 2016 चे विजेता कोण आहे?**

A. भारत B. इंग्लंड C. वेस्ट इंडीज D. न्यूझिलंड

**17. भारतीय घटनेचे शिल्पकार म्हणुन कोणाला ओळखले जाते?**

A. जवाहरलाल नेहरू B. डॉ.बाबासाहेब आंबेडकर

C. डॉ.राजेंद्र प्रसाद D. सरदार वल्लभभाई पटेल

**18. उत्कृष्ट अभिनेता म्हणुन 2016 साली राष्ट्रीय पुरस्कार कोणाला देण्यात आला?**

A. अमिताभ बच्चन B. अनिल कपूर C. आमीर खान D. रणवीर सिंग

**19. नाटकाच्या आरंभीचे स्तवन गीत, याला काय म्हणतात?**

A. अभंग B. नांदी C. स्वगत D. भरत वाक्य

**20. वारा या शब्दाचा समानार्थी शब्द सांगा?**

A. पावक B. अनल C. पावन D. अनिल

**21. ती पहा बस आली या वाक्याचा काळ ओळखा?**

A. अपूर्ण भूतकाळ B. साधा भूतकाळ

C. पूर्ण वर्तमानकाळ D. अपूर्ण वर्तमानकाळ

**22. एक वस्तू A ने B ला 50% तोट्याने विकली. B ने C ला तीच वस्तू 10% तोट्याने विकली. C ने D ला तीच वस्तू 25% तोट्याने विकली, जर D ने**

C ला वस्तूचे 1890 रूपये दिले तर त्या वस्तुची मूळ किंमत किती असेल?

A. रू.6000/- B. रू.5600/- C. रू.5700/- D. रू.5800/-

23. स्वामी समर्थांचे चमत्कारांविषवी माहिती देणारा 2015 साली चा मराठी चित्रपट कोणता?

A. देऊळ B. देवता C. देऊळ बंद D. वळू

24. खालीलपैकी कोणता एक प्रयोगाचा मुख्य प्रकार नाही?

A. कर्मणी B. भावे C. कर्तरि D. अभावे

25. दहा मूली, पंधरा मुले हे शब्द संख्या विशेषणाच्या कोणत्या प्रकारात येतात?

A. गणनावाचक B.क्रमवाचक C. पृथकत्ववाचक D. आवृत्तीवाचक

26. एका गावची लोकसंख्या 6400 आहे. दर वर्षी त्या गावची लोकसंख्या 25% ने कमी होत आहे. तर 2 वर्षानंतर त्या गावची लोकसंख्या किती होईल?

A. 3400 B. 3600 C. 3800 D. 4000

27. 5.4 या संख्येचा वर्ग किती?

A. 29.26 B. 29.36 C. 29.16 D. 29.46

28. एका काटकोन त्रिकोणात काटकोन करणाऱ्या बाजु या 9 सें.मी. व 12 सें.मी. आहेत. तर त्या त्रिकोणाचा कर्ण काढा?

A. 15 सें.मी. B. 12 सें.मी. C. 21 सें.मी D. 3 सें.मी.

29. 493039 चे घनमूळ किती?

A. 69 B. 59 C. 89 D.79

30. जवळची किंवा दूरची वस्तू दाखविण्यासाठी जे सर्वनाम वापरतात, त्यास कोणते सर्वनाम म्हणतात?

A. दर्शक सर्वनाम B. संबंधी सर्वनाम C. प्रश्नार्थक सर्वनाम D. सामान्य सर्वनाम

31. उस्मानाबाद जिल्ह्याला खालीलपैकी कोणत्या जिल्ह्याची सीमा लागत नाही?

A. सोलापूर B. बिदर C.अहमदनगर D.विजापूर

32. उस्मानाबाद जिल्ह्यात एकूण किती पोलीस स्टेशन कार्यान्वीत आहेत?

A. 16 B. 15 C. 18 D. 17

33. उस्मानाबाद जिल्ह्यातील जरबेरा फुलांचे खालीलपैकी कोणत्या नावाने नामकरण करण्यात आले आहे?

A. तुळजाई B. उपळा C. शिंगोली D. तेरणा

**34. पाया 18.2 सें.मी. व उंची 7.5 सें.मी. असलेल्या त्रिकोणाचे क्षेत्रफळ किती?**

A. 68.25 चौ.सें.मी. B. 68.45 चौ.सें.मी.

C. 68.75 चौ.सें.मी. D. 68.65 चौ.सें.मी

**35. आगंतुक या शब्दाबद्दल खालीलपैकी कोणता शब्दसमूह आहे?**

A. न आवडणारा पाहुणा B. सूचना न देता येणारा पाहूणा

C. परत न जाणारा पाहूणा D. न येणारा पाहूणा

**36. बदल होणे याला व्याकरणात विकार म्हणतात. विकारी यालाच दुसरा शब्द काय आहे?**

A. नाम B. विशेषण C. सव्यय D. अव्यय

**37. 10 टेबलची विक्री 15 टेबलच्या खरेदी इतकी असेल तर शेकडा नफा किती?**

A. 50% B. 60% C. 40% D. 30%

**38. सीमा जर गीता पेक्षा तीन दिवसांनी लहान आहे आणि सिताचा जन्म शनिवारी झाला असल्यास गीताचा जन्म कोणत्या वारी झाला असेल?**

A. मंगळवार B. बुधवार C. सोमवार D. गुरूवार

**39. 5 व 3 हे अंक वापरून तयार होणाऱ्या सर्वात लहान व मोठ्या संख्येतील फरक किती?**

A. 53 B. 35 C. 48 D. 18

**40. जर दृष्टी : डोळे तर स्पर्श : ........?**

A. त्वचा B. प्रकाश C. चष्मा D. केस

**41. क्रम पुर्ण करा : AE, CG, EL ........?**

A. IK B. GK C. IL D. KG

**42. विसंगत पर्याय ओळखा?**

A. रेडियम B. थोरीअम C. सोडीयम D. पोलीनियम

**43. एका गोलाचे पृष्ठफळ 5544 $cm^2$ तर त्याची त्रिज्या किती?**

A. 22 cm B. 23 cm C. 21 cm D. 24 cm

**44. एका आयाताचे क्षेत्रफळ 0.0288 चौरस सेंमी आहे. जर लांबी 1.6 सेंमी असेल तर रूंदी किती?**

A. 0.012 सेंमी B. 0.018 सेंमी C. 0.014 सेंमी D. 0.016 सेंमी

**45. 7 kg + 70 gm + 7 mg = ?**

A. 7.070007 kg B. 7.007007 kg

C. 7.0007007 kg D. 7.707 kg

**46. एका संख्येला 26 ने भागल्यास भागाकार 14 येतो व बाकी 14 उरते, तर त्या संख्येला 13 ने भागल्यास बाकी किती उरेल?**

A. 12 B. 27 C. 3 D. 1

**47. बाजीराव मस्तानी या चित्रपटाचे दिग्दर्शक कोण आहेत?**

A. फरहान अख्तर B. करण जोहर C. संजय लिला भन्साळी D. आशुतोष गोवारीकर

**48. तुळजाभवानी मंदिराच्या महाद्वारांमध्ये खालीलपैकी कोणत्या नावाने महाद्वार ओळखले जात नाही?**

A. जिजाऊ B. शहाजी C. संभाजी D. शिवाजी

**49. उस्मानाबाद जिल्ह्यातील ऐतिहासिक जैन मंदिरे कोणत्या ठिकाणी आहेत?**

A. येरमाळा B. येडशी C. सोनारी D. कुंथलगीरी

**50. उस्मानाबाद जिल्ह्यातुन कोणता राष्ट्रीय महामार्ग जातो?**

A. NH-1 A B. NH-6 C. NH-9 D. NH-11

**51. महाराष्ट्रातील फक्त 4 ठिकाणी असणाऱ्या शासकीय महाविद्यालयातील एक महाविद्यालय उस्मानाबाद जिल्ह्यामध्ये आहे, खालीलपैकी ते कोणते?**

A. शासकीय तंत्रनिकेतन B. शासकिय वैद्यकिय

C. शासकीय अभियांत्रिकी D. शासकीय आयुर्वेदिक

**52. रांगेतील नितीनचा नंबर दोन्ही बाजुकडून पंधरावा आहे, तर रांगेत एकूण मुले किती?**

A. 29 B. 25 C. 30 D. 31

**53. रशिद पश्चिमेकडे तोंड करून उभा आहे. तो घड्याळ्याच्या काट्याचे दिशेने 45 डिग्रीतून वळला व पुन्हा त्याच दिशेने 180 डिग्रीतून वळला व नंतर घड्याळयाच्या काट्याच्या विरूध्द दिशेने 270 डिग्रीतुन वळला त्याचे तोंड आता कोणत्या दिशेला आहे?**

A. दक्षिण B. वायव्य C. पश्चिम D. नैऋत्य

**54. S_MPLE : SM_RT ; TE_CHER ; _RMY या चार शब्दातील रिकाम्या जागी कोणते अक्षर लिहीले असता ते शब्द अर्थपूर्ण होतील?**

A. M B. T C. A D. S

**55. एक साधू नदीकाठी शिर्षासन करून उभा आहे. त्याचे तोंड पश्चिमेला आहे, तर त्याचे डाव्या हातास कोणती दिशा असेल?**

A. पश्चिम B. आग्नेय C. दक्षिण D. उत्तर

**56. 3 :9 :: 7_ ?**

A. 49 B. 50 C. 11 D. 81

**57. निर्वासीत या शब्दाबद्दल खालीलपैकी कोणता शब्दसमुह आहे?**

A. इतरांच्या आधारावर जगणारा B. स्वत:च्या घरात राहणारा

C. घरदार, देशास पारखा झालेला D. घरदार असलेला

**58. स, ला, ते, ...... स, ला, ना, ते हे कोणत्या विभक्तीचे प्रत्यय आहेत?**

A. प्रथमा B. द्वितीया C. तृतीया D. चतुर्थी

**59. जसे केळ या शब्दाचा अनेक वचन केळी तसे वेळ या शब्दाचे अनेकवचन काय?**

A. वेळी B. वेळेत C. वेळा D. वेळ

**60. डोक्यावर कातडे ओढणे या वाक्यप्रचाराच्या अर्थाचा योग्य पर्याय निवडा?**

A. कानाडोळा करणे B. डोळे झाकुन घेणे

C. डोळ्यात तेल घालणे D. डोळ्यास डोळा लागणे

**61. गाय : वासरू तसे हरीण : .....?**

A. लेकरू B. करडू C. शावक D. रेडकू

**62. नानाचा अभिनय कृत्रिम वाटत नाही या वाक्याचे होकारार्थी वाक्य कोणते?**

A. नानाचा अभिनय कृत्रिम वाटतो B. नानाचा अभिनय खरा वाटत नाही

C. नानाचा अभिनय स्वाभाविक वाटतो D. नानाचा अभिनय अस्वाभाविक वाटतो

**63. एका कुटुंबात वसंत वैभवपेक्षा लहान आहे. वासंती सुनंदापेक्षा मोठी आहे. वसंत सुनंदापेक्षा मोठा आहे. वासंती वसंतपेक्षा लहान आहे. तर सर्वात मोठे कोण?**

A. वासंती B. वैभव C. सुनंदा D. वसंत

**64. पुढील क्रम पुर्ण करा : 3, 6, 18, 72, ........?**

A. 144 B. 90 C. 360 D. 216

**65. शेजारच्या माणसाचा परिचय करून देतांना एक स्त्री म्हणाली, त्याची बायको**

माझे आईची एकुलती एक मुलगी आहे, तर त्या स्त्रीचे त्या माणसाशी नाते काय?

A. मेहुणी B. पत्नी C. आत्या D. यापैकी कोणतेही नाही

66. x हा पूर्व दिशेला चालु लागला. काही वेळाने उजवीकडे वळून चालु लागला. नंतर तो डावीकडे वळला व पुन्हा उजवीकडे वळून चालू लागला तर शेवटी कोणत्या दिशेने चालला?

A. उत्तर B. दक्षिण C. पश्चिम D. पूर्व

67. 22, 35, 40, 27, 29, 24, 32, 26 या संख्यांचा मध्यांक काय आहे?

A. 27 B. 28 C. 29 D. 29.375

68. एका चौरसाचे क्षेत्रफळ 1600 चौ.से.मी.असल्यास त्या चौरसाची परिमिती किती असेल?

A. 80 सें.मी. B. 120 सें.मी. C. 160 सें.मी. D. 40 सें.मी.

69. एक मोटार सायकल 40000 रूपयास खरेदी करून 30000 रूपयांस विकली तर त्या व्यवहारात शेकडा तोटा किती रूपये झाला?

A. 25% B. 15% C. 17.5% D. 20%

70. 25 चे 25% + 15 चे 15% = ?

A. 9.5 B. 7.5 C. 8.5 D. 10.5

71. 2.75 : 27.50 :: 36.57 : ? प्रश्नचिन्हाजागी खालीलपैकी कोणती संख्या येईल?

A. 36.57 B. 3657 C. 365.7 D. 3.657

72. PQ_QP_PQ_QPQ गाळलेल्या जागी कोणता पर्याय योग्य असेल?

A. PQP B. QQP C. PPQ D. QPQ

73. AZ : CX :: BY : ?

A. EV B. DW C. WD D. DV

74. ACE : 135 :: LOQ : ?

A. 121517 B. 121416 C. 121516 D. 181517

75. एका सांकेतिक भाषेत जर A ऐवजी 1, C ऐवजी 3, F ऐवजी 6 या क्रमाने अंक वापरले तर त्या सांकेतीक भाषेत BIGMAN हा शब्द कसा लिहाल?

A. 29711314 B. 29711134 C. 279113141 D. 297113114

76. 2X + 3 ही विषम संख्या आहे तर त्यापुढील क्रमाने येणारी विषम संख्या कोणती?

A. ZX +4   B. 2X+5   C. 2X+6   D. 2X+7

**77. 8 ने नि:शेष भाग जाणारी संख्या कोणती?**

A. 15642   B. 23726   C. 67008   D. 31486

**78. खालीलपैकी अशी लहानात लहान संख्या कोणती की, जिला 3, 4 व 5 ने भाग दिल्यास प्रत्येकी बाकी 1 राहते?**

A. 13   B. 21   C. 16   D. 61

**79. दोन संख्याचे गुणोत्तर 5:7 आहे, तर त्यांची बेरीज 132 असल्यास त्या संख्यातील फरक किती?**

A. 24   B. 25   C. 22   D. 23

**80. 8 : 32 :: 12 : ?**

A. 44   B. 48   C. 72   D. 71

**81. 13 : 196 :: 16 : ?**

A. 289   B. 144   C. 121   D. 324

**82. सुनिल उत्तरेकडे तोंड करून उभा आहे. उत्तरेस तो सरळ 9 कि.मी. चालत गेला उजवीकडे वळून तेथून त्याने 4 कि.मी. अंतर कापले. पुन्हा तेथून उजवीकडे वळून त्याने 15 कि.मी. अंतर कापले. पुन्हा एकदा उजवीकडे वळून 12 कि.मी.अंतर कापले तर आता तो मुळ स्थानापासून किती अंतरावर आहे?**

A. 6 कि.मी.   B. 8 कि.मी.   C. 17 कि.मी.   D. 10 कि.मी.

**83. स्वप्नील व मकरंद यांच्या आजच्या वयात 6 वर्ष फरक आहे. स्वप्नील मकरंद पेक्षा लहान आहे. आणखी 6 वर्षानंतर दोघांच्या वयात किती फरक असेल?**

A. 6   B. 12   C. 3   D. 9

**84. निलेश, नितीन व निनाद यांच्या आजच्या वयाची बेरीज 77 वर्षे आहे. तीन वर्षापुर्वी त्यांच्या वयाची बेरीज किती होती?**

A. 74 वर्षे   B. 68 वर्षे   C. 67 वर्षे   D. 69 वर्षे

**85. भृंग या शब्दाचा समानअर्थी शब्द ओळखा?**

A. नृप   B. अली   C. मृग   D. श्रृंग

**86. हरीणासारखे डोळे असणारी .......?**

A. मृगवती B. मीनाक्षी C. मीनाली D. मृगाक्षी

**87. चुकीचा असलेला वाक्य प्रचार ओळखा?**

A. जमिनदोस्त होणे- जमिनीवर झोपणे

B. टेंभा मिरवणे- दिमाख दाखविणे

C. जीव भांड्यात पडणे- संकट टळल्यामुळे बरे वाटणे

D. तिलांजली देणे- त्याग करणे

**88. 25 वर्ष पूर्ण झाल्याबद्दल साजरा करावयाचा उत्सव?**

A. रौप्य महोत्सव B. सुवर्ण महोत्सव C. अमृत महोत्सव D. हिरक महोत्सव

**89. पुढील वाक्यप्रचाराचा अर्थ ओळखा. अति तेथे माती**

A. खूप कष्ट केल्यास मातीमोल होतात

B. कोणत्याही गोष्टीचा अतीरेक वाईट असतो

C. अति शहाणपणं फायदेशीर नसते

D. अति श्रम फूकट जातात

**90. भारताची राजमुद्रा खालीलपैकी कोणत्या ठिकाणावरील अशोकस्तंभावरून घेण्यात आलेली आहे?**

A. सारनाथ B. पटणा C. इंदौर D. साँची

**91. भारतामध्ये केंद्रीय माहिती अधिकार अधिनियम कोणत्या वर्षापासुन लागू करण्यात आला?**

A. 2000 B. 2005 C. 2009 D. 2011

**92. महाराष्ट्र पोलीसांचे ब्रिद वाक्य काय आहे?**

A. खल निग्रहणाय B. सत्यमेव जयते C. खलरक्षणाय D. सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

**93. 47 व्या दादासाहेब फाळके पुरस्काराने खालीलपैकी कोणाला सन्मानीत करण्यात आले आहे?**

A. शशी कपूर B. मनोज कुमार C. अमिताभ बच्चन D. दिलीप कुमार

**94. खालीलपैकी कोणाला भारतरत्न प्रदान करण्यात आलेला नाही?**

A. प्रो.सी.एन.आर.राव B. प्रो.सी.व्ही.रमण C. सचिन तेंडूलकर D. मेजर ध्यानचंद

**95. 2016 साली कुंभमेळा कोणत्या ठिकाणी भरविण्यात येत आहे?**

A. अलहाबाद B. हरिद्वार C. नाशिक D. उज्जैन

**96. महाराष्ट्राचे पोलीस महासंचालक सध्या खालीलपैकी कोण आहेत?**

A. संजीव दयाळ B. दत्ता पडसळगीकर

C. राकेश मारिया D. प्रविण दिक्षीत

**97. महाराष्ट्र पोलीसांचा रेझींग डे हा कोणत्या तारखेला साजरा केला जातो?**

A. 2 जानेवारी B. 15 ऑगस्ट C. 1 मे D. 17 सप्टेंबर

**98. खालीलपैकी योग्य पर्याय निवडा?**

A. शहनाई-बिसमिल्ला खान B. सितार-झाकीर हुसेन

C. तबला-हरिप्रसाद चौरसिया D. बासरी- रवि शंकर

**99. महाराष्ट्रातील कोणत्या जिल्ह्यात दारूबंदी करण्यात आली आहे?**

A. गोंदिया B. चंद्रपुर C. नागपूर D. अकोला

**100. 2015 साली खालीलपैकी कोणाला ज्ञानपीठ पुरस्काराने सन्मानीत करण्यात आले आहे?**

A. भालचंद्र नेमाडे B. रघूवीर चौधरी C. वि.दा.करंदीकर D. केदारनाथ सिंग

# उत्तर तालिका

| Q | Ans | Q | Ans | Q | Ans | Q | Ans |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | B | 26 | B | 51 | D | 76 | B |
| 2 | A | 27 | C | 52 | A | 77 | C |
| 3 | C | 28 | A | 53 | D | 78 | D |
| 4 | D | 29 | D | 54 | C | 79 | C |
| 5 | D | 30 | A | 55 | C | 80 | B |
| 6 | B | 31 | D | 56 | A | 81 | A |
| 7 | D | 32 | C | 57 | C | 82 | A |
| 8 | A | 33 | B | 58 | B,D | 83 | A |
| 9 | C | 34 | A | 59 | C | 84 | B |
| 10 | D | 35 | B | 60 | A | 85 | B |
| 11 | B | 36 | C | 61 | C | 86 | D |
| 12 | A | 37 | A | 62 | C | 87 | A |
| 13 | C | 38 | B | 63 | B | 88 | A |
| 14 | D | 39 | D | 64 | C | 89 | B |
| 15 | B | 40 | A | 65 | B | 90 | A |
| 16 | C | 41 | B | 66 | B | 91 | B |
| 17 | B | 42 | C | 67 | D | 92 | D |
| 18 | A | 43 | * | 68 | C | 93 | B |
| 19 | B | 44 | B | 69 | A | 94 | D |
| 20 | D | 45 | A | 70 | C | 95 | D |
| 21 | B | 46 | D | 71 | C | 96 | D |
| 22 | B | 47 | C | 72 | A | 97 | A |
| 23 | C | 48 | C | 73 | B | 98 | A |
| 24 | D | 49 | D | 74 | A | 99 | B |
| 25 | A | 50 | C | 75 | A | 100 | B |